# शबरी कुंभ का?

कुंभ मेळा म्हटले की त्यामागे धार्मिक कल्पना असतात. कुंभ मेळ्याच्या प्रवकालात त्या पावन क्षेत्रावर स्नान केल्यास मोक्ष प्राप्ती होते असा आमचा समज आहे. शबरीसारख्या सामान्य स्त्रीच्या नावाने हा कुंभमेळा का? तसे पाहू गेल्यास ही शबरी माता आजच्या काळात मागासलेल्या समजल्या जाणाऱ्या भिल्ल समाजातील साधी सुधी बाई. आपण रामायण कथेत ही शबरी आणि तीची उष्टी बोरे रामाने खाल्ली ही कथा नेहमी वाचलेली आहे. त्याच्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया किंवा टीका-टिप्पणीही आपल्या वाचनात आल्या आहेत. पण रामाला नुसती उष्टी बोरे देणारी ही शबरी खरोखर फार ज्ञानी आणि अपार दूरदृष्टी असणारी विदुषी होती. प्रथम अंडे नंतर अंड्यातून जन्म घेणे म्हणून पक्षांना द्विज असे म्हणतात. तसेच प्रथम जन्म आणि विद्याभ्यासाच्या तयारीकरता उपनयन, मौजी बंधन म्हणून ब्राह्मणानांही द्विज म्हटले जाते. पण ही शबरी यापेक्षाही मोठी कर्तृत्ववान होती म्हणून भगवान वाल्मिकीने तिला ''त्रिजा'' म्हटले आहे. प्रथम जन्म, नंतर मातंग ऋषीकडे शिक्षण, सेवा व रामभेटीनंतर रामास मार्गदर्शन ही तीन स्थित्यंतरे शबरीच्या जीवनात आहेत.

तत्कालीन रामायणातील स्थिती आणि आजची भारताची स्थिती यात फारसा फरक नाही. लंकेपासून दंडकारण्यापर्यंत रावणाचे साम्राज्य होते. स्वतः रावण जर सीतेचे हरण करत होता तर यथा राजा तथा प्रजा या नात्याने त्याच्या राज्यात काय होत असेल याची कल्पना करा. दंडकारण्यात ऋषीमुनींचे आश्रम होते. या आश्रमातून सर्व सामान्यापासून राजपुत्रापर्यंत प्रत्येकास शिक्षण मिळत होते आणि या शिक्षणातून समाज घडत होता. म्हणून हे शिक्षणच बंद पाडण्याकरता रावण आणि त्यांचे सहकारी ह्या ऋषींचे आश्रम उद्ध्वस्त करीत होते. यत्र नार्युस्तु पूज्यंते रमेते तत्र देवताः असे सांगणारी वेदवाणी नष्ट करून स्त्रियांचे अपहरण होत होते. शिक्षण बंद पाडण्याकरता राक्षस ऋषीमुनींच्या आश्रमावर हल्ले करत. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो हे आज आपण म्हणू शकतो काय? शिक्षण हीनता, स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि राजकीय सत्तेचा दुरुपयोग जसा रामायणाच्या त्या काळी होता तशीच आज भारतात परिस्थिती नाही का? अशा वेळी ब्रह्मर्षी वसिष्ठाने नाही तर राजर्षी विश्वामित्राने ''ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा'' म्हणत राम-लक्ष्मणाला अयोध्येबाहेर काढले. शस्त्र, अस्त्र, शास्त्र याबरोबरच जन सामान्यांचे जीवनदर्शन विश्वामित्राने रामाला घडविले. असा हा सर्वसामान्य माणसाचे जीवन कसे असते हे माहीत असलेला, मिसळलेला त्यांच्या सुखदुःखाची जाणीव असलेला राम हा वनवास भोगण्याकरता वनवासात आला होता. चार चार राण्या असणारा दशरथ केवळ कैकेयीला दिलेल्या शब्दाखातर रामास राजपदावरून एकदम वनवासात पाठवतो. सावलीसारखा लक्ष्मण त्याच्याबरोबर राहतो आणि त्याच्या पादुका सिंहासनावर ठेऊन रामाच्या नावाने राज्य करणारा भरत हे सगळे काही वेगळेच वसायन होते. तोंडापाशी आलेला राजयोग दूर सारून पिता आणि सावत्र आई कैकेयी यांच्या शब्दाखातर राम अयोध्या सोडून दंडकारण्यात आलेला आहे हे शबरीस माहित होते. राम लक्ष्मणाचे विश्वामित्रासोबत दंडकारण्यात येऊन असूर शक्तीचे केलेले दमन ह्या शबरीस माहित होते. अशा या पराक्रमी व दुष्ट शक्तीचे निर्दालन करणारा राम कधी येतो याची शबरी वाट पाहत होती. वनवासाच्या संकटात दुष्काळात तेरावा महिना म्हणून वनवासात सीतेचे अपहरणही होते आणि अशा सर्व संकटास तोंड देणारा मर्यादापुरुषोत्तम राम मला कधी भेटेल याची शबरी वाट पाहत होती.

शबरीला रामाची भेट हवी होती ती मोक्षप्राप्तीकरता नव्हती, तिला रामाची भेट हवी होती ती तत्कालीन दानवी प्रवृत्तीचा शेवट करण्याकरता. अशा या रामाची व तीची भेट होते ती चमक डोंगरावर पंपा सरोवराच्या परिसरात. ती रामाला स्वतःकरता मोक्ष मागत नाही तर दानवी शक्तींमुळे त्रस्त जनतेला मुक्त करण्याची मागणी करते. ती रामाची भेट सुग्रीवाशी करून देते. अंगदाशी करून देते, जाबुंवताशी करून देते, नील, नल अशा सामान्य माणसांशी रामाची भेट घालण्याचे पवित्र कार्य या शबरीमातेने केले आहे. हे आणि यातूनच रामाला सापडतो तो महाबली पवनपुत्र हनुमान.

हे सीते हे सीते करणाऱ्या रामाला खल निर्दालन करण्याचे सूत्र सांगते तेही शबरी. सीतेच्या शोधाकरता रावणाची लंका उद्ध्वस्त करण्याचा सल्ला आणि मार्गदर्शन रामाला शबरीने दिले म्हणूनच महर्षि वाल्मिकीने तिला ''त्रिजा'' असे म्हटले आहे.

शबरीविषयी वेगवेगळ्या कथा आहेत. ती एक सामान्य भिल्लीण होती आणि मतंग (मातंग) ऋषीची शिष्या होती. पंपा सरोवराच्या परीसरात मातंग ऋषींचा आश्रम होता. एक सामान्य शिष्येचे जीवन जगत होती.

दुसरी एक कथा अशी आहे की ती शबर राजाची राजपुत्री होती. दंडकारण्यात शबराचे राज्य होते. वाली आणि सुग्रीव याचे राज्यही याच भागात होते. जांबुवंताचे राज्यही याच परिसरात होते. त्या काळात धर्मसत्ता आणि राज्यसत्ता हातात हात घालून राहत असत.

शबरीविषयी एक अशी कथा आहे की, भिल्ल जमातीत शबरी जन्मली त्या जमातीत मुलीच्या लग्नात सर्व जमातील लोकांना बकऱ्याच्या मांसाच्या सागुतीचे जेवण द्यावे लागे. शबरी लहान असतांनाच पुढची सोय म्हणून तिच्या वडिलांनी दोन-चार बकऱ्याची पिल्ले घेऊन ठेवली होती. कारण शबरीच्या लग्नात त्यांचा उपयोग करता येणार होता. शबरी या पिल्लांशी खेळत बागडत असे. या बकरीच्या पिल्लांचा तिला खूपच लळा लागला होता. त्या काळात ही बकरीची पिले तिचा जीव की प्राण झाली होती. परंपरेप्रमाणे शबरीचे लग्न ठरले. आता आपली ही पिल्ले मारली जाणार, त्यांचे जीवन संपणार व आपले वैवाहिक जीवन सुरू होणार याची कल्पना शबरीला आली. केवळ आपल्या लग्नामुळे आपली लाडकी बकरीची पिल्ले मारणार ही कल्पनाच तिला सहन होत नव्हती. आपण जर लग्नच केले नाही तर ह्या पिलांचा जीव वाचणार आहे. म्हणून या पिलांच्या प्रेमाकरता लग्न न करता तिने पित्याच्या गृहाचा त्याग केला. रात्रभर प्रवास तोही पायी आणि दिवसा एखाद्या दाट वृक्षाखाली नाही दाट वृक्षावर मुक्काम. कारण शबरीने घर सोडल्यावर तिचा पाठलाग होणार होता, म्हणून त्या बकरीच्या पिल्लाकरता लग्नाच्या आधीच तिने पित्याचे घर सोडले. मजल दरमजल करत शेवटी ती मतंग ऋषींच्या आश्रमात आली. पिल्लांच्या प्राणाकरता विवाह टाळण्याची सर्व कथा तिने मातंग ऋषींना सांगितली. मातंगांनी तिला आश्रमात आश्रय दिला. मातंग ऋषींना शबरीमध्ये काहीतरी वेगळेपणाची जाणीव झाली. थोडेसे ध्यानमग्न होताच त्यांनी शबरीला सांगीतले की हे भिल्लकन्या येथेच याच आश्रमात तुला एका महान पुरुष भेटेल व तुझ्या जीवनाचे सार्थक होईल.

शबरी, मातंग, वाली, सुग्रीव, जाबुवंत आणि राम लक्ष्मण यांची कथा एक समरसतेचा यशस्वी प्रयोग होय. उच्चवर्णीय राम लक्ष्मण व सर्व सामान्य वनवासी यांचा संबंध येणे ही फार मोठी समरसता आहे. ही समता नाही समता व असमानता केंव्हाही एकत्र येऊ शकत नाहीत, त्यात वेगळेपणाची भावना असते. ज्वारी व बाजरी एकमेकात मिसळले तरी ज्वारी व बाजरी वेगळी वेगळी दिसते. पण दूध व पाणी, पाणी व साखर एक मेकात असे मिसळून जातात की त्याचे वेगळेपण संपून गेलेले असते. राम लक्ष्मण, सुग्रीव हनुमान, शबरी माता, पक्षीराज जटायू, जाबुवंत आणि प्रंचड वानरसेना एकमेकात इतके मिसळून गेले होते की, हा त्याचा समूह हा एकरस, समरस झालेला होता.

अशा या त्रिजा शबरीच्या नावाने कुंभमेळा भरविला जाणार आहे. अशा या त्रिजा शबरीच्या पदस्पर्शाने पावने झालेले रामायणकालीन दंडकारण्य म्हणजेच आजचा गुजरातच्या दक्षिण भागात असणारा आजचा डांग जिल्हा. या जिल्ह्यात जवळपास ३०० च्या

आसपास गावे आहेत. या भागात जवळपास ९५ टक्के वनवासी लोक आहेत. भिल्ल, कोकणा, वारली वगैरे जाती जमाती प्रामुख्याने राहतात. डोंगराळ भाग रस्त्याच्या संपूर्णपणे असुविधा, शिक्षणाचा संपूर्ण अभाव अशी परिस्थिती. ही परिस्थिती ख्रिश्चनीकरणास अतिशय योग्य. अशा परिस्थितीचा फायदा न घेतला तर ते ख्रिश्चन मिशनरी कसले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर अगदी आताच्या काळातही या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या अशिक्षित, गरीबीने रंजल्या गांजल्या गेलेल्या वनवासींना धर्मांतराचे लक्ष केले. मग सेवा करून मेवा खाण्याचे सूत्र अमलात आले. आरोग्य सेवेकरता दवाखाने, शिक्षणाच्या सोयीकरता वेगवेगळ्या स्तरावर शाळा (मिशन स्कूल) शेतीच्या प्रगती करता आर्थिक प्रलोभनाच्या रूपात रोख रकमा, बीजभरण, खते अशी वेगवेगळी जाळी पसरून या भागात मिशनऱ्यांनी आपले पाय फैलावले. थोडेसे यश मिळताच हिंदूंची देवळे नाहीशी होऊन तेथे चर्चेस उभी राहू लागली. ह्या वनवासींचे ख्रिस्तीकरण झाले ते काही ख्रिश्चन धर्माची तत्त्वे पटली म्हणून नाही तर केवळ अज्ञान, आणि अभिलाषांना बळी पडल्यामुळे.

कुटुंबातील एक माणूस ख्रिश्चन झाला अशी ही काही कुटुंबे आहेत की, वडील व मुलगा हिंदू पण आई मात्र ख्रिश्चन. हळूहळू ही धर्म बदलणाऱ्यांची संख्या वाढू लागली. आणि मग सुरू झाले सूडनाट्य. ज्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला ते इतर वनवासीच राहिलेल्या गावकऱ्यांशी वाद घालू लागले. होळी, दिवाळी, गुढीपाडवा, हनुमान जयंती, गावची गावदेवीची यात्रा, यात या ख्रिश्चनांचा सहभाग घेणे टाळले, गावच्या सामुदायिक कामाची वर्गणी देणेही बंद केले. हिंदू वनवासींच्या काही धार्मिक श्रद्धा असतात, जसे नागपंचमीच्या दिवशी शेत नांगरायचे नाही, पोळ्याच्या दिवशी बैलाची पूजा तर करायचीच पण त्यांना कामाला जुंपायचे नाही. या श्रद्धांना मुद्दाम डिवचण्याकरता नागपंचमीस शेतात नांगर धरणे, पोळ्याचे दिवशी मुद्दाम बैलांना कामाला जुपणे अशा खोड्या काढणे सुरू झाले. जेथे हिंदू अल्पसंख्य असतील तर खुले आम चर्चची उभारणी आणि हिंदू देवदेवतांचे विडंबन सुरू झाले. हिंदू बहूल गावात या दांडगाया कमी प्रमाणांत असत. कितीही धर्म बदलला तरी बहुतेक नावे मात्र तशीच राहलेली. राम, लक्ष्मण, दशरथ, मागीर्थी, सीता अशी नावे पण गळ्यात मात्र क्रॉस. म्हणजे अजूनसुद्धा काहींच्या मनात हिंदू धर्माविषयी सुप्त प्रेम जागृत होते.

चमक डोंगरावर शबरीची श्री रामचंद्रांची भेट झाली. तेथे अद्यापही शीला आहेत. राम लक्ष्मण व शबरीच्या त्या शीळा मानल्या जातात. तेथे दरवर्षी यात्रा भरते. या यात्रेस जसे हिंदू वनवासी येतात तसेच ख्रिश्चन धर्म स्वीकारलेले काही ख्रिश्चनही आवर्जून येतात. जवळच्या पंपा सरोवरात स्नान करणे म्हणजे पुण्यप्राप्ती अशी कल्पना आजही त्या भागांत आहे. अशाच वेळी पूजनीय स्वामी असिमानंद यांचे आगमन त्या डोंगरावर झाले. आपली स्वतःची पूजा, अर्चना आटपली की स्वामीजी कोणाच्या तरी झोपडीसमोर येऊन उभे राहत. झोपडीतील माणसांची विचारपूस करत, जमलं तर तेथेच उपलब्ध असणार्या चटणी रोटी खात. एवढा मोठा साधुसंत माणूस आपल्या घरी येतो, आपल्या बरोबरच जेवतो, आपल्या सुखदुःखाची चौकशी करतो याते त्या वनवासींना खूप अप्रुप वाटे. नंतर संध्याकाळी काही वनवासी बांधव स्वामींच्या झोपडीत जमते. मग तेथे भजन किर्तन होत असे. हळूहळू स्वामींच्या झोपडीत येणाऱ्याची संख्या वाढू लागली कार स्वामीचा संपर्कही वाढू लागला. त्या भागातील आणि आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील वनवासींना सायंकाळी एकत्र जमण्याकरता स्थान मिळाले. या जमणाऱ्या लोकात काही ख्रिस्ती बांधवही असत. आपल्या पूर्वीच्या दिवसाचे, भजन-किर्तन पूजनाचे स्मरण होऊ लागले. स्वामींचे अशा माणसाकडे विशेष लक्ष असे. अशा माणसांशी त्यांचा संपर्क वाढू लागला. या परावर्तीत झालेल्या, ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या माणसांची मने चलबिचल होऊ लागली. आणि मग सुरू झालीय ''घर वापसी कार्यक्रमाची'' नांदी. हे वनवासी बांधव पुन्हा हिंदु धर्मात येण्यास तयार झाले. त्यांच्या करता एक फार साधी रीत स्वामीजींनी अमलात आणली. पंपासरोवर किंवा गावच्या नदी तलावात स्नान करायचे, मारुती, महादेव किंवा गावात पाड्यात असणाऱ्या देवळात यायचे, देऊळ नसल्यास गावदेवीच्या स्थानाजवळ यायचे. गळ्यात जर असलो तर क्रास काढून टाकायचा आणि मारुती, लक्ष्मी किंवा इतर कोणत्या तरी देवाचे लॉकेट गळ्यात घालायचे की झाले हिंदु धर्मात झाले आगमन. ह्या मोहिमेला फारच चांगला प्रतिसाद मिळाला व या ४/५ वर्षात जवळपास ३० ते ४० हजार लोकांनी हिंदु धर्मात प्रवेश केला.

आतापर्यंत ख्रिश्चन झालेल्या लोकांना परतीचा मार्ग नव्हता आणि त्यामुळे ख्रिश्चन पादरी बिनधास्त असत. त्यामुळे या ''घर वापसी कार्यक्रमा''चा धसका घेतला आहे. आणि आज या भागातील ख्रिश्चनाचा प्रभाव कमी झाला आहे. आपल्या धर्मात हरिद्वार, प्रयाग, उज्जैन व नाशिक त्र्यंबकेश्वर येथे कुंभ मेळे भरतात. यामागे धार्मिक व अध्यात्मिक भावनाच जास्त आहेत. स्वातंत्र्यापूर्वी ख्रिश्चनांची संख्या केवळ ५०० होती. आज दीड लाख लोकसंख्येत ४० हजार ख्रिश्चन आहेत. म्हणजे जवळपास लोकसंख्येच्या १/३ लोक ख्रिश्चन आहेत. धर्मांतराने संपूर्ण संस्कृति बदलते. विचारधारा बदलते. भारताशी एकनिष्ठ असणारे हिंदु ख्रिश्चन होताच ख्रिश्चन किंगडमशी आपली निष्ठा ठेवतात. उत्तर पूर्वेकडे याचा प्रत्यक्ष अनुभव येत आहे. त्या भागात आज सरळ सरळ ''**Indians go back**'' अशा घोषणा व पाट्या आपणास दिसत आहे. कारण आज ती राज्ये ख्रिश्चन बहुत झाली आहेत. आता यापुढे धर्मांतर होणार नाही, मतांतर होणार नाही आणि आमच्या राष्ट्रीयतेस कोणी आव्हान देणार नाही अशी काळजी घेणे जरुरी आहे. आमच्या वनवासीमध्ये आता असा आत्मविश्वास उत्पन्न करायचा आहे की, आम्ही वनवासी आहोत, जंगलचे राजे आहोत, आम्ही हिंदु आहोत, निसर्गपूजक आहोत. त्यामुळे आता आमच्यात धर्माच्या आधारे फूट पाडण्याचा प्रयत्न कोणीही करु नये; या वनवासीमध्ये असा आत्मविश्वास निर्माण करण्याकरता हा शबरी कुंभ मेळा आहे. जेव्हा शबरी कुंभात ५ ते लाख वनवासी सामील होतील तेव्हा ''देशद्रोही निष्प्रभ होतील, दर्शन घडला शक्तीचे'' सर्वांना हे कळेल की आता वनवासी समाजात जाऊन दुही पाडणे अशक्य आहे. आणि असा आत्मविश्वास निर्माण करण्याकरता हा कुंभमेळा आहे.

दीड लाख लोकवस्तीच्या ठिकाणी ५ ते ७ लाखाचा कुंभमेळा घेणे म्हणजे पर्यावरणाचा विनाश होय असा कुंभ विरोधकांनी असाच आरडाओरडा सुरु केला आहे. त्यांना हे स्पष्ट सांगावे वाटते की कुंभ मेळ्यात लोकांना राहण्याकरता जी नगरे, उभी करण्यात येणार आहेत त्यात एकही झाड तोडले जाणार नाही. नगर उभारणीच्या वेळी एखादे झाड मधे असेल तर त्या झाडाभोवती तंबू उभारला जाईल. येथे येणाऱ्या प्रत्येक भक्तांना विनंती करण्यात येत आहे की त्यांना कोणत्याही प्रकारे म्हणजे पिशव्या, बाटल्याच्या स्वरुपांत प्लॅस्टीक येथे आणू नये. चुकून आणल्यास ते परत घेऊन जाण्याची काळजी घ्यावी. याउपर जर काही प्लॅस्टीक त्या कुंभ मेळ्याच्या जागी उरलेच तर संयोजन समिती ते प्लॅस्टीक तेथे पडू देणार नाही.

येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरुची व्यवस्था ठीक लागेल याची व्यवस्था करण्यात आली आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरुस स्नान करता यावे याकरता पूर्णा नदीवर ''चेक डॅम्स'' बांधले आहेत. या डॅम्समध्ये आता भरपूर पाणी साठलेले आहे. याचा दुसरा एक महत्त्वाचा फायदा असा झाला आहे की, या मुळे त्या भागातील **water level** उंचावली आहे. या कुंभमेळ्याच्या निमित्त्याने डांगमधील सर्व ३०८ गावांना गुजरात वीज मंडळाने वीज पुरवठा केला आहे हीसुद्धा कुंभमेळ्याची उपलब्धीच आहे. या कुंभमेळ्यास गुजरात व महाराष्ट्राच्या लगतच्या भागाबरोबरच मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, झारखंड या भागातून वनवासी येणार आहेत. या सर्वांच्या सोयीकरता वर रस्ते बांधणे आणि अरुंद रस्ते रुंद करण्याचे काम सुरू आहे.

आजपर्यंत आम्ही नेहमीच मागे मागे राहिलो, पण आज आमच्या बांधवानीच आम्हास प्राधान्य देत हा कुंभमेळा आयोजित करून आमचा आत्मविश्वास वाढला आहे. वनवासीच्या एकत्र शक्तीचे दर्शन सर्व लोकास व्हावे ह्या करता हा कुंभमेळा आहे.